**नियमीत दिवाणी दावा.नं.८०६/२०१३ मधील नि.१५ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा त्रयस्थ इसम श्री.राजेंद्र भाऊसाहेब कडु, रा.देवळाली प्रवरा, ता.राहुरी, जि.अहमदनगर यांनी वादीने त्यांना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घ्यावे म्हणून आदेश होण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जावर वादीने त्यांचे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे त्रयस्थ इसमाने त्यांच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. दावा मिळकत आपल्याला मिळावी या दुष्ट हेतुने अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्याने तो नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

३. अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ श्री.ई.आर.खपके व वादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.आर.एम.उंडे यांचे म्हणणे ऐकले.

४. प्रस्तुतचा दावा हा वादीने ते मौजे देवळाली प्रवरा येथील गट क्र.१९०९/२ मधील ३५ आर क्षेत्रावर प्रतिवादी क्र.१ ते १५ यांचा कुठलाही हक्क हितसंबंध नाही असे घोषित होवून मिळणेसाठी व निरंतर मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

५. त्रयस्थ इसमाच्या म्हणण्याप्रमाणे सदर मिळकत ते बटाईने वहिती करत असून दावा मिळकत त्यांचे ताब्यात आहे. त्याचप्रमाणे वादीचा मुलगा मॅन्युअल पेत्रस संसारे याने दि.०३/०१/२००७ रोजी पुणे येथे भुखंड खरेदी करण्यासाठी रकमेची मागणी केली. त्याप्रमाणे त्रयस्री इसमाने वादी व त्याचे मुलाला दावा मिळकतीची खरेदी किंमत म्हणून रु.१२,५०,०००/- दिलेली आहे व त्याप्रमाणे करारनामा देखील झालेला आहे. परंतु, वादी व त्याचे मुलाने कराराची पुर्तता करुन दिलेली नाही.

६. त्रयस्थ इसमाच्या पुढील म्हणण्याप्रमाणे वादी व त्याचे मुलास त्रयस्थ इसम व इतर हिस्सेदाराच्या अपरोक्ष दावा मिळकत हस्तांतरीत करावयाची आहे. त्यामुळे वस्तुस्थिती न्यायालयासमोर मांडणेसाठी त्रयस्थ इसमास दाव्यामध्ये समाविष्ट करुन

त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक असल्याने प्रस्तुत अर्ज मंजुर करण्याची मागणी केलेली आहे.

७. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने व त्रयस्थ इसमाने हजर केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यावरुन असे दिसून येते की, दावा मिळकत त्रयस्थ इसमाच्या ताब्यात असल्याचा कुठलाही पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. त्रयस्थ इसमाने दि.२५/०५/२००७ रोजी वादीचा मुलगा मॅन्युअल संसारे याने तथाकथितरित्या करुन दिलेल्या पावतीची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. त्या तथाकथीत करार पावतीवर कुठेही वादीची स्वाक्षरी असल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे ज्या व्यक्तीने तथाकथीत करार पावती लिहून दिली त्याचे नाव दावा मिळकतीला कुठेही नमुद असल्याचे दिसून येत नाही.

८. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन करता, वादीचा मुलगा मॅन्युअल संसारे हा या दाव्यामध्ये वादी अथवा प्रतिवादी म्हणून समाविष्ट नाही. त्यामुळे त्रयस्थ इसम ज्या व्यक्तीमार्फत दावा मिळकतीमध्ये त्याचा हक्क सांगत आहे ती व्यक्तीच या दाव्यामध्ये समाविष्ट नाही. त्यामुळे त्रयस्थ इसम हा दाव्यामध्ये उपस्थित झाल्याने सर्व प्रश्नांचा परिणामकारकरित्या व पूर्णपणे न्यायनिर्णय करण्यासाठी आवश्यक पक्षकार ठरत नाही. त्यामुळे या दाव्यामध्ये उपस्थित झालेल्या प्रश्नाशी त्रयस्थ इसमाचा कुठलाही संबंध नसल्याने प्रस्तुत अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

( **प्र.ना.कुलकर्णी** )
२रे सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,
राहुरी, जि. अहमदनगर.

दिनांक: २०/०४/२०१६